# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

दूरध्वनी क्रमांक :
०२०—२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल :dyracademic@unipune.ac.in

---

संदर्भ क्र. : CA/1211 दिनांक : 23/06/2018

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित विधी महाविद्यालये

विषय:— राज्यातील सर्व विधी अभ्यासक्रमांसाठी महाविद्यालयातील तुकडयांची संख्या सुधारित करण्याबाबत.

संदर्भ:— २) मा.शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अशाम—२०१७/विधी महा. सुधारीत तुकडया/मवि—२/६८८६, दि. ११.०६.२०१८

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, **महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक: विधी—२०१८/प्र.क्र. ३४/मशि—२, दि. ०६ जून, २०१८** सोबत जोडलेला आहे. सदर शासन निर्णयातील आशय स्वयंस्पष्ट असून सदरबाबतची नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आपला,
23/6/18

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

सोबत: वरीलप्रमाणे

राज्यातील सर्व विधि अभ्यासक्रमांसाठी
महाविद्यालयातील तुकड्यांची संख्या
सुधारित करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : विधि-२०१८/प्र.क्र.३४/मशि-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख : ०६ जून, २०१८.

वाचा :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. सीयुसी-१०८८/(२०२९)/ मशि-३, दिनांक १० जानेवारी, १९९६,
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. बैठक-१०९६/विधीमहा/ (५३९/९६)/मशि-३, दिनांक २८ एप्रिल, १९९७,
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.विधी-२०१६/प्र.क्र.२४१/ मशि-२, दिनांक १७ मे, २०१७,
४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.एनजीसी-२०१७/ (२९/१७)मशि-४, दिनांक १५ सप्टेंबर, २०१७,
५) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एनजीसी-२०१७/ (१२८/१७)/मशि-४, दिनांक ४ जुलै, २०१७.

प्रस्तावना :-

न्यायालयीन निर्णय विचारात घेता, संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये, राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विधी महाविद्यालयांना सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून अनुदान योजना लागू करण्यात आली. तसेच, संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये प्रत्येक तुकडीत जास्तीत जास्त ८० विद्यार्थी असावे व महाविद्यालयास ५ वर्षाचा विधी अभ्यासक्रम व ३ वर्षाचा विधी अभ्यासक्रम मिळून एकूण जास्तीत जास्त २० तुकडया मंजूर करण्यात येतील, अशा महाविद्यालयात एकूण कमाल विद्यार्थी संख्या १६०० (८० X २०=१६००) असावी, अशी तरतूद होती. यापैकी प्रत्येक तुकडीनिहाय विद्यार्थी संख्येची तरतूद संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येऊन, सन २०१७-१८ पासून राज्यातील सर्व विधी पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रति तुकडी ६० विद्यार्थी अशी करण्यात आली. त्यामुळे महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी संख्या १२०० (२०X६०=१२००) झाली. त्यामुळे विद्यार्थीसंख्या पूर्ववत करण्याची मागणी महाविद्यालयांकडून करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे काही नामांकित विधी महाविद्यालयांमध्ये प्रवेशाकरिता विद्यार्थ्यांचा ओढा असल्याने अशा नामांकित महाविद्यालयांची विद्यार्थी संख्या वाढविण्याची मागणी विद्यार्थ्यांकडूनही करण्यात येत आहे. मात्र, महाविद्यालयामध्ये जास्तीत जास्त २० तुकड्या असण्याची मर्यादा विचारात घेता, जास्त विद्यार्थी प्रवेशित करता येत नसल्याची अडचण महाविद्यालयांनी निदर्शनास आणली. या बाबी

तसेच विधी अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल विचारात घेता महाविद्यालयांमधील ३ वर्ष व ५ वर्ष विधी अभ्यासक्रमांच्या तुकड्यांची कमाल मर्यादा सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयातील परिच्छेद-४ मधील तुकड्यांची कमाल संख्या व कमाल विद्यार्थी संख्या यामध्ये सुधारणा करण्यात येत असून, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून, राज्यातील विधी पदवी अभ्यासक्रमांसाठी महाविद्यालयातील ३ व ५ वर्षाच्या विधी अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाच्या तुकड्यांची प्रत्येकी कमाल मर्यादा ०५ तुकड्या इतकी राहील. पुढील वर्षाच्या (दुसरे, तिसरे... याप्रमाणे) तुकड्यांना नैसर्गिक वाढीचे तत्व लागू राहील. त्याअनुषंगाने ५ वर्षांच्या विधी अभ्यासक्रमाच्या एकूण तुकड्यांची कमाल मर्यादा २५ तुकड्या राहिल व ३ वर्षांच्या विधी अभ्यासक्रमाच्या तुकड्यांची कमाल मर्यादा १५ तुकड्या राहिल.

२. तुकडी मान्यतेसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ व संदर्भ क्र.४ व ५ येथील शासन निर्णय, तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेले निकष व कार्यपद्धती अनुसरुन शासनाकडे प्रस्ताव पाठविणे अनिवार्य राहील. शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय वाढीव तुकडी सुरु करता येणार नाही.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०६१५५७१११८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hariram V Parhate

Digitally signed by Hariram V Parhate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8bfd656b321bf6c348564562d46cd2934b62b770484625206559a2c204e56cb8, serialNumber=d01f16685aedf1abc9cfd58347280b4c4cb8d304afd1d413884ef4d91aa1462d, cn=Hariram V Parhate
Date: 2018.06.06 16:00:11 +05'30'

(ह. व्यं. पऱ्हाते)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मंबई
४. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
५. कुलगुरु, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई, नागपूर व औरंगाबाद.

६. उपाध्यक्ष, स्टेट बार कौन्सिल ऑफ इंडिया, २ रा मजला, उच्च न्यायालय विस्तार, मुंबई ४०००३२.
७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्यामार्फत)
१०. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, उच्च शिक्षण पुणे यांच्यामार्फत)
११. प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई.
१२. महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
१३. महालेखापाल,(लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर,
१४. कार्यासन अधिकारी (मशि-४), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (मशि-२).